**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**
**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

पोलीस स्टेशन गडचिरोली जि. गडचिरोली

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** गडचिरोली **P.S.(ठाणे):** गडचिरोली

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0163 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**17/03/2025 22:33

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 12/03/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 17/03/2025
**Time From (वेळेपासून):** 12:07 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 11:43 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 17/03/2025 **Time (वेळ):** 20:45 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 048
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 17/03/2025 22:33 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 01 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** शबरी आदीवासी वित्त ,विकास महामंडळ मर्या कार्यालय , 44265

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्री दुर्योधन फाल्गुन उईके

(b) **Father's Name** (वडील चे नाव) : फाल्गुन उईके

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1998

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | कोरेगांव ,देसाईगंज,देसाइगंज,गडचिरोली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | कोरेगांव ,देसाईगंज,देसाइगंज,गडचिरोली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय): कष्टकरी

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8806396792

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. रूपेश वसंत बारापात्रे | | वडील का नाम : वसंत बारापात्रे | 1. आझाद चौक आरमोरी,आरमोरी, आरमोरी,गडचिरोली,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

फिर्यादी रिपोर्ट देताच

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि | संगणकाचे सुटे भाग | सन्डीक्स कंपनीचे 32 जिबी | 0.00 |

यानंतर पोनि पाटील साहेब यांनी त्यांच्या कार्यालयातील हजर स्टाफची मला व पंचांना ओळख करुन दिल्यावर पोलीस निरीक्षक श्री संतोष पाटील यांनी माझेकडुन सापळा कारवाईसाठी वापरण्यात येणारी लाच रक्कम रू. 50,000/- ( 500/-रू. दराच्या 100 चलनी नोटा) घेतले. त्यानंतर सदरच्या नोटांचे क्रमांक नोंदवुन घेण्यात आले व माझी अंगझडती घेवुन सदरच्या नोटांना अँथ्रॅसिन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्यांचे कार्यालयातील सहा.फौजदार श्री. सुनिल पेद्दीवार यांनी त्याचे गुणधर्म व प्रात्यक्षीक करून दाखवुन लाचेच्या रक्कमेस अँथ्रॅसिन पावडर लावली. त्यानंतर पोनि पाटील साहेबांनी दिलेल्या सुचनेवरून पोशि संदिप घोरमोडे यांनी त्यांच्या कार्यालयात असलेले सोनी कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डर कश्याप्रकारे काम करते याबाबत पंचांसमोर सविस्तर माहीती देवुन सदरचे व्हाईस रेकॉर्डरचा वापर करुन लाच मागणीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले.
त्यानंतर पोनि पाटील साहेब यांनी पंचासमक्ष गैरअर्जदाराकडे लाच मागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत मला व दोन्ही पंचांना सविस्तर सुचना दिल्या व दोन्ही पंचांनी माझी पडताळणीपुर्व अंगझडती घेतली.
पोनि पाटील साहेब यांचे सुचनेनुसार पोशि संदिप घोरमोडे यांनी सोनी कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमोरी कार्ड टाकुन व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून सदर मेमरी कार्डात पुर्वीचे कोणतेही संभाषण नसल्याची खात्री करवुन देवुन वेळ 12.07 वा. व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्रं.1 श्री. निखील कोकुलवार यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हॉईस रेकॉर्डर माझे आतील बनियानला लटकवून ठेवून, मला पंच क्रं. 1 यांचेसह शबरी आदीवासी विकास व वित्त महामंडळ, गडचिरोली जवळ मी आणलेल्या दुचाकी वाहनाने पाठविण्यात आले. मी व पंच क्र. 1 असे शबरी आदीवासी विकास व वित्त महामंडळ, गडचिरोली जवळ पोहचून माझे मोबाईलने श्री. रूपेश बारापात्रे बाबु साहेब यांना फोन लावुन स्पिकर ऑन करून बोलणी केली असता, बारापात्रे बाबु यांनी "आलास का? किती आणलांस? तु ऑफीसमध्ये आहे का बाहेर आहेस, थांब एक मिनीट थांब मी फोन लावतो असे बोलून फोन कट केले, व नंतर थोडयाच वेळात त्यांनी मला फोन करून "ह किती आणलास असे विचारले असता, मी त्यांना "आणलो आहो न आता ते, अनामत रक्कम भरणेवाली आणलो आहो" तेव्हा त्यांनी "अन एक्स्ट्रा, तुला मी सांगतो, तु त्याच्याकडे देवून ठेवून दे, तिथे कांतिचद पुराम कोण आहे म्हणा, त्यानले भेटा, त्यांचेकडे दयाहाचा आहे, त्यानले भेटून टाक, मी आल्याबरोबर तुले व्हॉटसप करतो, मी चंद्रपूरमधीच आहो आता, आल्या बरोबर तुले व्हॉटसपले मॅसेज टाकतो. ठिक आहे" असे बोलल्याने मी ऑफीसमध्ये जावून कांतिचंद पुराम यांना भेटून अनामत रक्कम एक लाख रूपये भरण्याकरीता त्यांचेकडे दिले व एक लाख रूपये अनामतची रक्कम भरल्याबाबत पुराम यांना रिसीप्ट मागितली असता त्यांनी रिसीप्ट वगैरे काही नाही, नंतर देतील ते तुले रिसीप्ट असे बोलल्याने मी बारापात्रे बाबु यांना फोन करून 'पुराम यांच्याकडे अनामत रक्कम एक लाख रूपये दिल्याची माहिती देवुन त्यांना रिसीप्ट बाबत विचारणा केली असता, त्यांनी 'मी आल्यावर तूले व्हॉटसपले रिसीप्ट पाठवून देतो, किंवा आरमोरीले आल्यावर घेवुन टाक, झाला तुझा काम, तू निश्चिंत रहा आता, झाल तुझा काम, तू फक्त इकडचा अरेंजमेंट कर आता' 'तु आता इकडचा अरेंजमेंट कर म्हटलो' अशा प्रकारे बोलणी करून घडलेली हकीकत सांगणे करीता मी आणि पंच क्र. 1 मिळुन ला.प्र.वि. गडचिरोली येथे परत आलो. माझे बनियानच्या आतमध्ये लटकून ठेवलेले व्हॉईस रेकार्डर काढून लाच रक्कम मागणी पडताळणी कारवाई करून परत आल्याबाबत पंच क्रं. 1 यांच्या आवाजात व्हॉईस रेकॉर्डर वेळ 13.23 वा. बंद केले व नंतर दोन्ही पंचानी माझी अंगझडती घेतली.
यानंतर पोनि पाटील साहेब यांनी पंच क्र. 1 श्री. निखील कोकुलवार व मला बारापात्रे बाबु यांचेसोबत झालेल्या संभाषणाबाबत विचारणा केली. यानंतर पोनि पाटील साहेब यांनी दोन्ही पंचासमक व्हॉईस रेकॉर्डरमधले संभाषण ऐकूण व पंच क्र.1 यांचे घडलेल्या परिस्थीतीच्या कथनावरून रूपेश बारापात्रे यांनी मला अनामत रक्कम 1,00,000/-रू. कांतीलाल पुराम यांचेकडे देण्यास सांगून अनामत रक्कम 1,00,000/-रू. व्यतिरिक्त 'एक्सट्राचे' तू फक्त इकडचा अरेंजमेंट कर आता' 'तु आता इकडचा अरेंजमेंट कर म्हटलो असे सांगुन लाच मागणीची इच्छा प्रदर्शित करून "ठिक आहे न .. मी बोलतो मी गाडीमधे आहे" असे बोलुन नंतर पुन्हा बोलणे करण्यासंदर्भाने संकेत दिल्याने रूपेश बारापात्रे हे मला फोन करून बोलविण्याची वाट पाहत थांबुन पुढील कारवाई करण्याचा दोन्ही पंचासमक्ष निर्णय घेतला. याबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोनि पाटील साहेब यांनी पंचनामा क्रं. 1 मध्ये घेतल्या आहेत.
दि.13/03/2025 रोजी रूपेश बारापात्रे यांनी त्यांचा मोबाईल नंबर वरून मला मिसकॉल दिल्याने मी त्यांना फोन केला असता त्यांनी मला "तुझे अनामत रकमेचे एक लाख पुराम कडुन मिळाले असुन ते बँक ऑफ बडोदा मधे मी भरले तरच तुझे लोन मंजुर होवुन जाईल पण तु साहेबाचे 50,000/- रूपये दुपारपर्यंत ऑफीसमध्ये पैसे आणून दे, नाहीतर काम होणार नाही" असे सांगितल्याने मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय गडचिरोली येथे 12.20

वा.दरम्यान हजर आलो.
त्यानंतर पोनि पाटील साहेब यांनी पंचासमक्ष गैरअर्जदाराकडे लाच मागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सागुन पडताळणी कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत मला व दोन्ही पंचांना सविस्तर सुचना दिल्या व दोन्ही पंचांनी माझी पडताळणीपुर्व अंगझडती घेतली. पोनि पाटील साहेब यांचे सुचनेनुसार पोशि संदिप घोरमोडे यांनी सोनी कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमरी कार्ड टाकुन व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून सदर मेमरी कार्डात पुर्वीचे कोणतेही संभाषण नसल्याची खात्री करवुन देवुन वेळ 13.29 वा. व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्रं. 1 श्री. निखील कोकुलवार यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हॉईस रेकॉर्डर माझे आतील बनियानला लटकवून ठेवून, मला पंच क्रं. 1 यांचेसह शबरी आदीवासी विकास व वित्त महामंडळ, गडचिरोली येथे मी आणलेल्या दुचाकी वाहनाने पाठविण्यात आले. मी व पंच क्र. 1 असे दोघेही शबरी आदीवासी विकास व वित्त महामंडळ, गडचिरोली येथे जावून बारापात्रे यांना भेटलो असता बारापात्रे यांनी मला कर्ज मंजूर करणेकरीता 50,000/-रू. लाच रक्कमेची मागणी केली असता त्यांना मी 35,000/- रूपये जमल्याचे सांगीतल्याने, बारापात्रे यांनी 35,000/-रू. लाच रक्कम बॅक ऑफ बडोदा, शाखा गडचिरोली येथे दुपारी 03.00 वाजेपर्यंत आणुन देण्यास सांगितले व उर्वरीत 15,000/-रू. नंतर आणून देण्यास सांगितल्याने घडलेली हकीकत सांगणेकरीता मी, पंच क्र. 1 असे मिळुन ला.प्र.वि. गडचिरोली येथे परत आलो. त्यानंतर माझे बनियानच्या आतमध्ये लटकून ठेवलेले व्हॉईस रेकार्डर काढून लाच रक्कम मागणी पडताळणी कारवाई करून परत आल्याबाबत पंच क्रं. 1 यांच्या आवाजात व्हॉईस रेकॉर्डर वेळ 14.15 वा. बंद केले व नंतर दोन्ही पंचानी माझी अंगझडती घेतली. यानंतर पोनि पाटील साहेब यांनी पंच क्र. 1 व मला बारापात्रे बाबु यांचेसोबत झालेल्या संभाषणाबाबत विचारणा केली.
यानंतर पोनि पाटील साहेब यांनी दोन्ही पंचासमक्ष व्हॉईस रेकॉर्डरमधले संभाषण ऐकूण व पंच क्र.1 यांचे घडलेल्या परिस्थीतीच्या कथनावरून बारापात्रे बाबु यांनी मला शबरी आदीवासी विकास व वित्त योजने अंतर्गत वाहन खरेदी कर्ज 10,00,000/-रू. मंजूर करण्याकरीता अनामत रक्कम 1,00,000/-रू. व्यतिरिक्त 50,000/-रू. ची मागणी करून तडजोडीअंती 35,000/-रू. लाच रक्कम बॅक ऑफ बडोदा शाखा गडचिरोली येथे दुपारी 03.00 वाजेपर्यंत आणुन देण्यास सांगितले व उर्वरीत 15,000/-रू. कर्ज मंजूर झाल्यानंतर आणून देण्यास सांगून लाच रक्कम स्विकारण्याची संमती दर्षविल्याचे खात्री केली. त्यानंतर पोनि पाटील यांचे सुचनेनुसार दोन्ही पंचानी माझी अंगझडती घेतलेवर पोशि जेट्टीवार यांनी बारापात्रे यास 35,000/- रूपयाची लाच रक्कम रूपेश बारापात्रे यास देणेकरीता वेगळी काढुन मी जमा केलेल्या 50,000/-रू. पैकी उरलेले 15,000/- रु. वेगळे काढुन एका लिफाप्यात ठेवले व मला पंचासमक्ष अँथ्रासिन पावडर लावलेली 35,000/- लाचेची रक्कम माझे जिन्सपॅन्टचे समोरील उजव्या बाजुचे खिश्यात अलगत ठेवले. त्यानंतर सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत स्पष्ट सुचना देवुन बारापात्रे यांनी स्वतः किंवा इतर व्यक्तीच्या माध्यमातुन लाच रक्कम स्विकारल्यावर दर्शनी भागी येवून लाच रक्कम स्विकारल्याचा इशारा म्हणुन डोक्यावरील दुपट्टा काढुन गळयात अडकावणेचा इशारा करण्याबाबत मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारणा-यास रंगेहाथ पकडतील असे सांगण्यात आले. यानंतर सापळा पथकातील सर्व सदस्यांना त्यांनी सुचना दिल्या.
पोनि पाटील यांचे सुचनेवरून पोशि संदिप घोरमोडे यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून वेळ 15.24 वा. व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्रं. 1 श्री. निखील कोकुलवार यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हॉईस रेकॉर्डर माझे बनियानच्या आतमध्ये लटकवून ठेवून पंच क्रं. 1 सह मी आणलेल्या दुचाकी वाहनाने बॅक ऑफ बडोदा शाखा गडचिरोली येथे पाठविण्यात आले. त्याचवेळी सापळा पथकातील काही सदस्य गटा-गटाने माझे मागोमाग आले. मी व पंच क्र. 1 असे दोघेही मिळून ला.प्र. वि गडचिरोली येथून माझे दुचाकी वाहनाने रवाना होवून बॅक ऑफ बडोदा शाखा गडचिरोली येथे जावून बारापात्रे यांना फोन करून बॅंक ऑफ बडोदा येथे आल्याचे सांगीतल्यावर बारापात्रे तेथे त्यांच्या एका मित्रासोबत आले व मला 'जमवलास का' 'किती जमवलास.. तिस हजार' तेव्हा मी हो असे सांगीतले असता बारापात्रे याने ''तीस न पाच पस्तीस , मग पंधरा कधी' असे म्हणुन पंधरा हजार कधी देतेस, तु सोमवारी पु-या तयारीने भेट, तु पन्नासची अरेंजमेंट कर, पस्तीस झालेच आहेत पंधराची अरेंजमेंट कर फायनल करून टाकु' 'तु अकरा वाजता येती पोहोच' असे बोलले असता मी त्यांना 35,000/-रू. आणलो आहे, बाकीचे पैसे नाही जमा झाले तेव्हा त्यांनी ''पस्तीस हजार व उर्वरीत पंधरा हजार असे मिळुन पुर्ण 50,000/-रू. रक्कम सोमवारी 11.00 वा. तेथेच आणून दे, असे सांगून लाच रक्कम न स्विकारता सोमवार दि. 17/03/2025 रोजी बोलावल्याने घडलेली हकीकत सांगणेकरीता मी पंच क्र. 1 सह ला.प्र.वि. गडचिरोली येथे परत आलो. त्यानंतर पोनिरी पाटील साहेब यांनी माझे बनियानच्या आतमध्ये लटकून ठेवलेले व्हॉईस रेकार्डर काढून लाच रक्कम मागणी पडताळणी कारवाई करून परत आल्याबाबत पंच क्रं. 1 यांच्या आवाजात व्हॉईस रेकॉर्डर वेळ 16.09 वा. बंद केले व नंतर दोन्ही पंचानी माझी अंगझडती घेतली व माझे खिषातील लाच रक्कम 35,000/-रू. पोशि जेट्टीवार यांचे हस्ते

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| | इलेक्ट्रॉनिक सामान | | मेमोरी कार्ड 03 नग | |
| 2 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | मोबाईल फोन | गुन्हयाचे संबधीत छायकींत कागदपत्र 22 पाने | 12,000.00 |
| 3 | कागदपत्रे आणि मुल्यवान रोखे | किरकोळ कागदपत्र | गुन्हयाचे संबधीत छायकींत कागदपत्र 22 पाने | 0.00 |
| 4 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 50,000 रू. 500 रू. दराच्या 100 नोटा | 50,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

62,000.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद
पोलीस स्टेशन गडचिरोली
दिनांक17/03/2025
नाव:-श्री दुर्योधन फाल्गुन उईके, वय 27 वर्षे, धंदा-मजुरी, मु.पो.कोरेगांव ता. देसाईगंज
जि. गडचिरोली मो.नं. 8806396792

मी दि. 12/03/2025 रोजी श्री. संतोष पाटील, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गडचिरोली यांचे समक्ष एका लोकसेवका विरूद्ध लाच मागणी संबंधाने लेखी तक्रार दिली होती. मी दिलेली लेखी तक्रार खालीलप्रमाणे.

मी महाराष्ट्र शासनाच्या www.mahashabari.in या साईटवर आदिवासी शबरी आदीवासी विकास व वित्त महामंडळ, यांच्याकडुन आदीवासी बेरोजगार युवकांना विवीध योजनांच्या अनुशंगाने वित्त सहाय्य देणेत येत असल्याने मी साधारणता सप्टेंबर 2024 मधे पहील्या आठवड्यात वाहन व्यवसाय योजने अंतर्गत वाहन खरेदी करणेकरीता ऑनलाईन अर्ज सबमिट केला होता. या योजनेच्या अंतर्गत मला शबरी आदीवासी विकास व वित्त महामंडळ, गडचिरोली यांचेकडुन दहा लाख रूपयांचे कर्ज मंजुर होणार होते. नमुद योजनेकरीता संपुर्ण कागदपत्र मी सबमिट केले होते. त्यानंतर मी त्याच महिन्याच्या अखेरीस गडचिरोली येथील शबरी आदीवासी विकास व वित्त महामंडळाच्या ऑफीसला जावुन अर्जाचे काय झाले याबाबत व्यवस्थापक श्री. बोरूले साहेब यांना विचारणा केली असता त्यांनी मला त्यांच्या कार्यालयात काम करणारा कंत्राटी ऑपरेटर रूपेश बारापात्रे यांच्यासोबत बोलण्यास सांगीतले होते. त्याप्रमाणे रूपेश बारापात्रे यांना त्याच वेळी भेटलो असता त्यांनी माझा मोबाइल नंबर घेवुन नंतर कळवितो असे सांगीतले होते.
यानंतर दिनांक दि.11/02/2025 रोजी दुपारी 01.26 वा. मी गावी असतांना रूपेश बारापात्रे यांनी त्यांचा मो.क्र. 8329539776 वरून मला माझा मोबाईल नंबर 8806396792 यावर फोन करून ''तुमचे कर्ज मंजुर झाले असुन, तुम्ही फोन करून ऑफिसला येवुन 1,00,000/रू. चालान भरून घ्या''असे सांगितले. म्हणुन मी लगेच सदरच्या पैश्यांची जुळवाजुळव करून त्याच दिवशी दुपारी 03.30 वा.च्या दरम्यान पैसे भरण्यासाठी शबरी आदीवासी विकास व वित्त महामंडळाच्या गडचिरोली येथील शाखेत व्यवस्थापक श्री. बोरूले साहेबांकडे गेलो असता श्री.बोरूले साहेब तिथे आंम्हाला भेटले नाही. त्याचवेळी शाखेत काम करणारे श्री. रूपेश बारापात्रे हे तिथे भेटले. तेव्हा मी त्यांना मंजुर कर्जाविषयी आणी चालान ची रक्कम भरणेविषयी बोललो असता, त्यांनी मला सांगीतले की ''तुंम्ही मला फोन न करता कसे काय आले'' असे बोलले असता त्यांना मी ''तुंम्हीच मला वाहन कर्ज मंजुर

झाल्याचे सांगीतल्याने मी 1,00,000/- रू. अनामत रक्कम भरण्यासाठी आलो आहे. तेव्हा श्री.रूपेश बारापात्रे यांनी मला सांगीतले की, ''1,00,000/-रूपये कर्जाच्या अनामत रकमेचे झाले परंतु कर्ज मंजुर केल्यासाठी आमचे बोरूले सरांनी तुझ्याकडुन चालान रक्कमेच्या 1,00,000/- रू. व्यतिरिक्त 50,000/- रू. कर्ज मंजुर करण्यासाठी त्यांच्याकरीता मागण्यास सांगीतले आहे, तर तु त्यांच्यासाठी 50,000/- रूपये मार्जीन मनीसोबत घेवुन ये'' असे सांगितले. त्यावर मी त्यांना मार्जीन मनीचे एक लाख रूपये कसे तरी जमवले असुन साहेबाला द्यायला माझेकडे पैसे नाहीत, असे सांगीतलो असता रूपेश बारापात्रे सांगीतले की, 'तु जर साहेबाचे 50,000 रू नाही दिला तर तुझी योजना आम्ही दुस-यांना देवु. आमच्याकडे पैसे देणारे लोकं व योजना घेणारे लोकं भरपुर आहेत. बोरूले सर हे मराठवाड्यातले असल्याने ते पैसे घेतल्याशिवाय मानत नाहीत'. असे म्हणून मला पैशाची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना माझ्याकडे साहेबांना देण्यासाठी एवढे पैसे नाहीत असे सांगीतले असता त्यांनी ''मी बोरूले साहेबांना विचारतो'' असे सांगुन माझ्या समोर कोणलातरी फोन लावुन बाजुला जावुन त्यांचेशी बोलणे करून फोन कट झाल्यावर मला सांगीतले की 'मी आता बोरूले साहेबाशी बोललो आहे, ते सांगीतले आहे की, चालानाचे 1,00,000/-व्यतिरीक्त आपल्याला वरचे 50,000/-रूपये देतील तर कर्ज मंजुर करतो नाहीतर कर्ज मंजुर करत नाही, तुझे काम आता होल्ड केले आहे, तु नंतर ये' असे सांगुन मला नंतर येण्यास सांगीतले. सदर वेळी मी रूपेश बाबुला ''आंम्ही गरीब माणसा आहोत, चालानाचे 1,00,000/-रूपये कसेतरी जमा केलेत, आता वरचे साहेबाला 50,000/-रूपये देण्यासाठी कुठुन आणणार'' असे सांगीतले असता श्री. रूपेश बारापात्रे यांनी मला सांगीतले की ''तुला साहेबाचे 50,000/-रूपये द्यावेच लागतील , तु पैसे दिलास तरच साहेब कर्ज मंजुर करेल , नाहीतर तुझा कट करून दुस-याला मंजुर करतील, मी तुला नंतर फोन करेन तेव्हा तु मला पैसे देणार आहेस का नाही ते भेटुन सांग, कोणाले पैसे मागीतल्याचा सांगीतलास तर साहेबाला सांगुन तुझा कर्ज रिजेक्ट करून टाकेल'' असे सांगीतल्याने मी घाबरून कुठे तक्रार केली तर आमचे कर्ज मंजुर होणार नाही या भितीने कोणाकडे तक्रार केली नाही. यांनतर वेळोवेळी मला रूपेश बारापात्रे यांनी फोन करून काही कागदपत्रे अपुर्ण असल्याचे सांगुन माझेकडे वेगवेगळे कागदपत्रे मागणेच्या बहाण्याने पैशांबाबत विचारणा करता मी त्यांना माझ्याकडे पैसे नसल्याचे सांगुन त्यांनी मागणी केलेले कागदपत्रे त्यांना व्हाटसपवर कागदपत्रांची पुर्तता केली होती.

यांनतर दिनांक 10/03/2025 रोजी दुपारी 01.21 वा.च्या सुमारास मी गावी असतांना श्री.रूपेश बारापात्रे यांनी त्यांचा मो.क्र. 8329539776 वरून मला माझा मोबाईल नंबर 8806396792 यावर फोन करून ''साहेब तुझे कर्ज मंजुर करणार आहे , मंजुर कर्जाची 10 टक्के अनामत रक्कम 1,00,000/रू. चालानाचे भरण्यासाठी आणी बोरूले साहेबाने कर्ज मंजुर करण्यासाठी त्यांना द्यायचे 50,000/- रू. असे एकुण 1,50,000 /-रू. उद्या दुपारपर्यंत घेवुन या ''असे सांगुन पुन्हा माझेकडे मंजुर कर्जाचे 10 टक्के रक्कम 1,00,000/-रू. या कायदेशीर फि व्यतिरीक्त शबरी महामंडळ ,गडचिरोलीचे व्यवस्थापक श्री. बोरूले साहेब यांचे नावे पुन्हा 50,000/- लाच रकमेची मागणी केली. माझेकडे पैश्यांची जुळवाजुळव झाली नसल्यामुळे मी त्यांचेकडे गेलो नाही. परंतु आज पुन्हा मी गडचिरोली येथे आलो असतांना सकाळी 07.30 वा. च्या सुमारास मला श्री. रूपेश बारापात्रे यांनी त्यांचा मो.क्र. 8329539776 वरून मला माझा मोबाईल नंबर 8806396792 यावर फोन करून ''तुला बोरूले साहेब विचारत होते काल का नाहीस आला म्हणुन, तुझे कर्ज मंजुर करणार आहेत. तु मार्जीन मनी आणी साहेबाचे पैसे घेवुन ये.मार्जीन मनी शासनाच्या खात्यावर 1,00,000/-रूपये बँक ऑफ बडोदा मधे भर आणी साहेबाचे 50,000/- रू. मला आणुन दे. गडचिरोली आल्यावर मला बाहेरच फोन करून भेट'' असे सांगुन पुन्हा माझेकडे लाचेची मागणी केली.

श्री. रूपेश बारापात्रे बाबु साहेब यांचेषी माझी कोणतीही वैयक्तीक दुश्मनी नाही अथवा भांडण नाही. तसेच कोणतेही आर्थिक देवाण घेवाणचे व्यवहार नाहीत. परंतु श्री. रूपेश बारापात्रे बाबु यांनी मला शबरी आदीवासी विकास व वित्त महामंडळ, गडचिरोलीचे व्यवस्थापक श्री. बोरूले साहेब यांनी माझे वाहन व्यवसाय योजने अंतर्गत वाहन खरेदी करणेकरीता 10,00,000/-रूपये कर्ज मंजुरीचे काम करून द्यावे म्हणून 50,000/- रू श्री. बोरूले साहेब यांच्या नावे लाच रक्कमेची मागणी केली असुन त्यांना रू. 50,000 लाच देण्याची माझी मुळीच इच्छा नसल्याने मी आज दि.12/03/2025 रोजी त्यांचे विरूध्द कायदेशीर कारवाई करण्याकरीता स्वेच्छेने तक्रार देत आहे. मी सोबत आणलेली 50,000 रू. हे माझे वैयक्तीक बचतीतील आहेत.

त्यानंतर पोनि संतोष पाटील यांनी दोन शासकिय पंचांना पाचारण करुन त्यांची व माझी ओळख करून दिली असता पंच म्हणुन 1.श्री. निखील कोकुलवार 2. श्री. दिलीप राणे दोन्ही पंच जिल्हा परीषद कर्मचारी हे असल्याचे मला माहीत झाले. पोनि पाटील यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकिकत सांगुन माझी लेखी तक्रार पंचांना वाचण्यास दिले. तसेच मी त्यांना माझी सदरची तक्रार समक्ष सांगीतली त्यांची खात्री करुन सदरच्या तक्रारीवर दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर पोनि पाटील यांनी सुध्दा स्वाक्षरी केली.

काढुन बारापात्रे याने 35,000/- रूपये न स्विकारता 50,000/- रूपये एकत्रीत मागणी केल्याने यापुर्वी जमा रकमे पैकीचे अँन्थ्रासीन पावडर लावलेल्या उर्वरीत 15,000/-रू.रक्कमेत एकत्र करून असे एकूण 50,000/-रू. एकत्रित करून लिफाफ्यात ठेवुन सदर लिफापा पोनि पाटील साहेब यांनी ताब्यात घेतला . यानंतर पोनि पाटील साहेब यांनी पंच क्र. 1 व मला बारापात्रे बाबु यांचेसोबत झालेल्या संभाषणाबाबत विचारणा केली.
यानंतर पोनि पाटील साहेब यांनी दोन्ही पंचासमक्ष व्हॉईस रेकॉर्डरमधले संभाषण एकले व सोमवार दि. 17/03/2025 रोजी सापळा कारवाई करण्याचे ठरविले. याबाबतच्या सविस्तर नोंदी पोनि पाटील साहेब यांनी पंचनामा क्रं. 2 मध्ये घेतल्या आहेत.
दि. 17/03/2025 रोजी मी ला.प्रवि. गडचिरोली येथे 10.00 वा. हजर आल्याने पोनि पाटील साहेब यांनी सापळ्याचे आयोजन केले. पोनि पाटील साहेब यांच्या सुचनेनुसार दोन्ही पंचानी माझी अंगझडती घेवून बारापात्रे यांनी 50,000/- रूपयाची मागणी केल्याने पोनि पाटील साहेबांच्या सुचनेवरून पोशि जेट्टीवार यांनी पंचासमक्ष अँथ्रासिन पावडर लावलेली 50,000/- लाचेची रक्कम माझे जिन्सपॅन्टचे समोरील डाव्या बाजुचे खिश्यात अलगत ठेवले. त्यानंतर पुन्हा सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत स्पष्ट सुचना देवुन बारापात्रे यांनी स्वतः किंवा इतर व्यक्तीच्या माध्यमातुन लाच रक्कम स्विकारल्यावर दर्शनी भागी येवून लाच रक्कम स्विकारल्याचा इशारा म्हणुन डोक्यावरील दुपट्टा काढुन गळयात अडकावणेचा इशारा करण्याबाबत मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारणा-यास रंगेहाथ पकडतील असे सांगण्यात आले. यानंतर सापळा पथकातील सर्व सदस्यांना त्यांनी सुचना दिल्या.
पोनि पाटील साहेबांच्या सुचनेवरून पोशि संदिप घोरमोडे यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून वेळ 11.14 वाजता व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हॉईस रेकॉर्डर माझे बनियानच्या आतमध्ये लटकवून ठेवून मला पंच क्रं. 1 सह माझे दुचाकीने बॅक ऑफ बडोदा शाखा गडचिरोली येथे पाठविण्यात आले. त्याचवेळी सापळा पथकातील काही सदस्य गटा-गटाने माझे मागोमाग आले. मी बॅंक ऑफ बडोदा शाखा गडचिरोली जवळ जावून बारापात्रे यांना फोन केलो असता त्यांनी " पैसे क्लिअर झाले का..थांब तेतीच, " असे बोलल्याने मी त्याच ठिकाणी थांबलो होतो. थोडयावेळात बारापात्रे बाबु यांचे परत मला फोन आला व त्यांनी मला शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ कार्यालय गडचिरोली येथील ऑफीस मध्ये येण्यास सांगितल्याने, मी माझे दुचाकीने पंच क्र. 1 यांचे सह शबरी आदिवासी विकास व वित्त महामंडळ कार्यालय गडचिरोली येथे गेलो असता, त्याठिकाणी बारापात्रे हे हजर मिळुन आले व त्यांनी मला " पावती देत आहो म्हणुनच तुले दे म्हणत आहो पैसे" असे बोलुन पैशाची मागणी केल्याने, मी अँथ्रासिन पावडर लावलेले रू. 50,000/- लाचेची रक्कम माझे जिन्सपॅन्टचे समोरील डाव्या बाजुच्या खिश्यातुन डाव्या हाताने काढुन "मोजुन घ्या, मोजुन घ्याल म्हणतो, नाही तर कमी जास्त अजुन म्हणाल का" असे बोलुन बारापात्रे यांना 50,000 रू. लाच रक्कम दिले असता, त्यांनी लाच रक्कम रू. 50,000/-उजव्या हाताने स्विकारुन दोन्ही हाताने मोजू लागले, त्याचवेळी मी दर्शनी भागी येउन सापळा पथकास डोक्याला बांधलेला दुपट्टा काढून गळयात ठेवून लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इशारा केला. त्याचवेळी सापळा पथकाने बारापात्रे यांना रंगेहात पकडुन पुढील कारवाई केली. पंच क्रं. 1 यांच्या आवाजात प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर वेळ 11.43 वाजता व्हॉईस रेकॉर्डर बंद केले व नंतर माझी अंगझडती घेतली. लाच रक्कम 50,000/- रू., वाहन कर्जासंबधीचे कागदपत्र तसेच रेडमी नोट 7 एस कंपनीचा 1 मोबाईल हे बारापात्रे यांचेकडुन तसेच नमुद कारवाईतील मेमरी कार्ड पंचासमक्ष जप्तीपत्रका प्रमाणे पुराव्याकामी जप्त केले. सापळा कार्यवाही बाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोनि पाटील साहेबांनी पंचनामा क्र. 3 मध्ये घेतले आहेत.
तरी श्री. रूपेश वसंत बारापात्रे वय 40 वर्षे, पद-कार्यकारी लेखापाल (कंत्राटी) शबरी आदीवासी वित्त व विकास महामंडळ मर्या. कार्यालय गडचिरोली यांनी मला महाराष्ट्र शासनाचे शबरी आदीवासी वित्त व विकास महामंडळाच्या मालवाहु वाहन व्यवसाय कर्ज योजने अंतर्गत मालवाहु वाहन खरेदी करणेकरीता 10,00,000/-रूपये कर्ज मंजुरीचे काम शाखा व्यवस्थापक श्री. हर्षल बोरोले यांनी करून देणेकरीता 1,00,000/- रूपये शासकिय अनामत रक्कमे व्यतिरीक्त श्री. हर्षल बोरोले शाखा व्यवस्थापक यांच्या नावे 50,000/- रू. लाच रक्कमेची मागणी करुन पंचासमक्ष स्विकारतांना रंगेहात मिळून आल्याने त्यांच्याविरूद्ध माझी कायदेशीर फिर्याद आहे.
माझी वरिल खबर माझे सांगणेप्रमाणे मराठीत संगणकावर टंकलिखीत केली असुन त्याची प्रिंट काढल्यानंतर मी ती स्वता वाचुन पाहीली. ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष हि लिहुन दिली खबर

(संतोष पाटील)

पोलीस निरीक्षक
ला.प्र.विभाग, गडचिरोली.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (**केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):**

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे नाव**):**
Santosh Budha Patil
**Rank (**पद**):** I (Inspector) **No.(**क्र.**):** dgpsbpm8008
**to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or (**किंवा**)**

(3) **Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**

**or (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**)**

(4) **Transferred to P.S.**
**(**गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव**):**

**District (**जिल्हा**):**
**on point of jurisdiction (**को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित**) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (**प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.**)**

**R.O.A.C.(**आर. ओ .ए .सी.**)**

पोलीस स्टेशन गडचिरोली
सत्यमेव जयते
जि. गडचिरोली

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

Duikey

**15. Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** SHARAD MAHADEV I
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** DGPSMMM8706

ड्युटी ऑफीसर
नांव
पद
पोलीस स्टेशन, गडचिरोली

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(**जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.**)**